## निशाणी क्र. ३६ वर आदेश

अर्ज व त्यावरील खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी C.P.C. ऑर्डर ९ नुसार प्राथमिक मुद्दा काढण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन की, दावा हा खरेदीखत रद्द होऊन मिळणेसाठी व इतर मागण्यासांठी केला आहे. वादी यांनी नि.क्र. ३ सोबत काही दस्त दाखल केले आहेत. यामध्ये खरेदीखत दस्त क्र. २४४८/२००८ व २४४७/२००८ हे दस्त दिनांक १५.१०.२००८ रोजी नोंदविण्यात आले आहे. दावा हा तेरा वर्षांनंतर दाखल करण्यात आला, त्यामुळे मुदतीच्या कायद्याची बाधा येते. सबब त्यावर प्राथमिक मुद्दा काढून, सदरील दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते काय ? हा निश्चित करणे योग्य राहील. त्यामुळे न्यायालयाचा अमुल्य वेळ वाचेल सबब अर्ज मंजुर व्हावा अशी विनंती केली.

३. वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जास पुरजोर विरोध केला. अर्ज हा कायदेशीर नाही. न्यायालयाची दिशाभूल करणारा आहे. कामकाज प्रलंबित ठेवण्यासाठी अर्ज दाखल केला. C.P.C. ऑर्डर ९ प्रमाणे अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांची मागणी ही नमुद संदर्भातील आदेश करण्यासाठी तरतुद नाही. त्यामुळे अर्ज हा नामंजुर व्हावा अशी विनंती केली. व प्रतिवादी जास्तीत जास्त कॉस्ट व्हावी.

४. उभय यपक्षांचा युक्तीवाद एकून प्रकरणाचे अवलोकन केले. दावा हा खरेदीखत रद्द करुन मिळणेसाठी वाटणीसाठी व कब्जासाठी केलेला आहे. दाव्यामध्ये तीन प्रतिवादी होते. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ या मयत झाल्या. दाव्यामध्ये नि.क्र. ३ दस्तावेज क्र. १ व २ अन्वये खरेदीखत दाखल आहे. सदरचे खरेदीखत हे २००८ चे आहे. दावा हा २०१९ मध्ये दाखल करण्यात आला.

५. प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रीया संहितेचे आदेश ९ अन्वये प्राथमिक मुद्दा काढण्यासाठी दाखल करण्यात आला. आदेश ९ यामध्ये, पक्षकारांची उपस्थितीत व अनुपस्थिती याचा परिणाम नमुद केला आहे. यामध्ये बरेचशे नियम आहेत. परंतू प्राथमिक मुद्दा कोणत्या नियमाखाली निश्चित करावा याबबत नमुद नाही. नेमका हाच आक्षेप वादी यांनी घेतलेला आहे. त्यामुळे अर्ज हा दिवाणी प्रक्रीया संहितेचे आदेश ९ च्या तरतुदींनुसार नाही असे मी माझे मत नोंदवितो. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज खारीज करण्यात येतो.

२. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सही/–

दिनांक २४.०८.२०२१

रा.भा.डोळे

सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, साक्री

## : <u>प्रमाणपत्र:</u>

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक २५.०८.२०२१.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३